# विद्यापीठात वनस्पतीशास्त्र प्रॅक्टिकल हँडबुकचे प्रकाशन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या भाग-२ च्या प्रॅक्टिकल हँडबुकचे प्रकाशन शुक्रवारी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. जाधव यांच्या हस्ते झाले. डॉ. ए. एन. सादळे, डॉ. एम. बी. वाघमारे, डॉ. नीलेश पवार, डॉ. एम. एन. देसाई, डॉ. एस. एन. जाधव, डॉ. एम. एस. बनसोडे यांनी पुस्तकाचे लेखन केले आहे. यावेळी प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, माजी विभागप्रमुख डॉ. बी. ए. कारदगे, प्रा. डॉ. पी. डी. चव्हाण, डॉ. जे. बी. दीक्षित, रावसाहेब पुजारी उपस्थित होते.

लोकमत

मी दुर्गा

# तिमिरातुनी तेजाकडे वाटचाल

अंधत्वामुळे (दिव्यांगत्व) निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत कोल्हापूरच्या डॉ. अंजली वसंत निगवेकर यांनी संगीत क्षेत्रात स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. कुटुंबीयांच्या पाठबळावर त्यांनी संगीत आणि शिक्षण क्षेत्रात वाटचाल करीत यशाचे विविध टप्पे पार केले आहेत. आज त्या शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

डॉ. निगवेकर यांचा जन्म आईच्या माहेरी हुबळीत झाला. जन्मत:च त्यांच्यामध्ये दृष्टिदोष होता. त्यांना केवळ रंग आणि माणसांची किंवा वस्तूची केवळ आकृती दिसायची. त्यांच्यावर उत्तम उपचार व्हावेत, योग्य शिक्षण मिळावे यासाठी वडिलांनी नांदेडहून नागपूरला बदली करून घेतली. मात्र, त्या दुसरीत असताना डॉ. निगवेकर यांच्या एका डोळ्याची दृष्टी गेली. ब्रेललिपी वाचन स्पर्धेच्या निमित्ताने त्या मुंबईला गेल्या होत्या. त्यांची निवासव्यवस्था असलेल्या दादर येथील कमला मेहता स्कूल फॉर ब्लाइंड या अंधशाळेतील शिक्षण त्यांना आवडले. त्यावर त्यांनी वडिलांना सांगून इयत्ता तिसरीचे शिक्षण घेताना मुंबईतील या अंधशाळेमध्ये प्रवेश घेतला. तेथूनच वयाच्या नवव्या वर्षीपासूनच त्यांचे स्वावलंबनाचे धडे सुरु झाले.

या शाळेमध्ये अगदी खेळापासून विज्ञानाच्या प्रयोगापर्यंत, शालेय अभ्यासक्रमापासून ते संगीतापर्यंतचे शिक्षण देण्यात येत होते. आठवीत गेल्यावर निगवेकर यांचा दुसरा डोळादेखील निकामी झाला. पूर्णत: पसरलेल्या अंधाराचा त्यांना सुरुवातीला खूप त्रास झाला; पण त्यातून त्या घडत गेल्या. प्राचार्या नमाताई भट यांचा मोठा आधार त्यांना लाभला. अंधशाळेत रोज सकाळी आणि संध्याकाळी त्यांना शिक्षक गोकुळदास जोशी हे संगीत शिकवायचे. त्यामुळे त्यांच्यामध्ये संगीताची आवड निर्माण झाली. पुढे त्या इयत्ता सातवीमध्येच मध्यमा आणि दहावीत संगीत विशारद झाल्या. मुंबईतील ‘एसएनडीटी’ कॉलेजमध्ये अकरावी-बारावीचे शिक्षण त्यांनी घेतले. तेथून पदवीच्या शिक्षणासाठी पुन्हा त्या नागपूरला आल्या. येथे त्यांनी इंग्रजी, तत्त्वज्ञान आणि संगीत विषय घेऊन पदवीचे शिक्षण पूर्ण केले. यादरम्यान वडील सेवानिवृत्त झाले. मूळ गाव कोल्हापूर असल्याने आणि येथे शिवाजी विद्यापीठ असल्याने पुढील शिक्षणासाठी हे ठिकाण डॉ. निगवेकर यांना अधिक सोईस्कर वाटले.



डॉ. अंजली निगवेकर

> आयुष्याकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन नेहमीच आशावादी आणि सकारात्मक राहिला आहे. आपण जर प्रामाणिकपणे प्रयत्न करून काही साध्य करण्याचा प्रयत्न केला, तर त्यात आपल्याला नक्कीच यश मिळू शकते, यावर माझा विश्वास आहे. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर माझी आई सुहासिनी आणि वडिलांनी मोठी साथ आणि पाठबळ दिले. माझ्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संगीताने मला अध्यात्म शिकविले. मला प्रेरणा देऊन माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. यापुढील आयुष्य मला संगीत साधनेत व्यतित करावयाचे आहे. समाजाने दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या योग्य क्षमतेनुसार संधी उपलब्ध करून द्यावी.
>
> - डॉ. अंजली निगवेकर

विद्यापीठातून शास्त्रीय संगीतात त्यांनी एम. ए. आणि पीएच.डी.चे शिक्षण पूर्ण केले. त्यांना डॉ. भारती वैशंपायन, सुधाकरबुवा डिग्रजकर यांच्याकडून संगीताचे धडे मिळाले. शिक्षणानंतर याच विभागात त्या प्राध्यापक म्हणून रुजू झाल्या. गेल्या २८ वर्षांपासून याविभागात त्या कार्यरत आहे. संगीत आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना ‘नॅब इंडिया’, ‘निर्धार वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हल’ अशा विविध सहा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. संगीताची दिव्यदृष्टी लाभलेल्या निगवेकर यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी ठरणारा आहे.

**- संतोष मिठारी,** कोल्हापूर

## नवनवे प्रयोग करण्याची आवड

- तबला, हार्मोनियम, पारंपरिक तानपुरे, इलेक्ट्रॉनिक्स तानपुरा अशी सर्व वाद्ये निगवेकर यांना हाताळता येतात. इतकेच नव्हे, तर त्या संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोन आणि आयपॉडही वापरतात. संगीतामध्ये त्या नवनवीन प्रयोग करतात.
- मुंबई विद्यापीठातील अंबुजा साळगावकर यांनी रवींद्रनाथांच्या कवितांचा अनुवाद केला, तर त्यांना चाली देऊन निगवेकर यांनी 'रवींद्र संगीता'चा तसेच मूळ बंगाली गीतांचा कार्यक्रम केला.
- सी. रामचंद्र, मंगेश पाडगावकर, श्रीनिवास खळे, संत सूरदास यांचे संकल्पनानुसार कार्यक्रम सादर केले. या क्षेत्रात नवनवे प्रयोग करायला त्यांना आवडतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या चार विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत.

लोकमत

# कुडित्रेत विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धा आजपासून

**कोपार्डे :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा (पुरुष) फ्री स्टाईल व ग्रीको रोमन व महिला फ्री स्टाईल स्पर्धा म. ह. शिंदे महाविद्यालय तिसंगी (गगनबावडा) यांच्या संयोजनाने आज, सोमवार ते २ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. के. शिंदे व क्रीडा संचालक प्रा. बाजीराव पाटील यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

युवराज पाटील कुस्ती संकुल, कुंभी-कासारी साखर कारखाना, कुडित्रे येथे स्पर्धा होईल. उद्घाटन महाराष्ट्र केसरी पै. नामदेव मोळे, क्रीडा अधिकारी बालाजी बरबडे, पी. जी. शिंदे, स्वप्निल शिंदे, शिंदे विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक पी. टी. गायकवाड, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संभाजी वरुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. कोल्हापूर, सांगली, सातारा या विभागांतून प्रत्येक वजनीगटामध्ये निवड झालेले पुरुष खेळाडू व प्रत्येक महाविद्यालयातून महिला खेळाडू सहभागी होतील. पुरुष, महिला फ्री स्टाईल स्पर्धा आज, सोमवारी, तर पुरुष ग्रीको रोमन स्पर्धा १ व २ ऑक्टोबरला होणार आहे.

# वनस्पतीशास्त्र प्रात्यक्षिक पुस्तिकेचे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या भाग २ च्या प्रात्यक्षिक पुस्तिकेचे (प्रॅक्टिकल हँडबुक) प्रकाशन शुक्रवारी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागात विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. जाधव यांच्या हस्ते झाले. या पुस्तकाचे लेखन डॉ. ए. एन. सादळे, एम. बी. वाघमारे, नीलेश पवार, एम. एन. देसाई, एस. एन. जाधव, एम. एस. बनसोडे यांनी केले आहे. यावेळी प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, बी. ए. कारदगे, पी. डी. चव्हाण, जे. बी. दीक्षित, एन. बी. गायकवाड, के. बी. पवार, एस. जी. घाणे, रावसाहेब पुजारी उपस्थित होते.